# विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून पाहावे

## कुलगुरू डॉ. शिर्के : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून पाहावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

न्यू कॉलेजच्या वतीने आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षस्थानी होते.

क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. आर. व्ही. शेटगे समारंभास उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. सर्वसाधारण विजेतेपद शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लजने तर द्वितीय क्रमांक न्यू कॉलेजने मिळवला. पुरुष विभागाचे विजेतेपद नाईट कॉलेज व महिला विभागाचे विवेकानंद कॉलेजने पटकावले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून प्रतीक पाटील व महिला खेळाडू म्हणून प्राजक्ता शिंदे यांना बहुमान मिळाला.

प्रा. अमर सासने यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत के. जी. पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी.



# विवेकानंद कॉलेजला विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत अजिंक्यपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. संघात रिया पाटील, तन्वी जामसांडेकर, ऋतिका मगदूम, श्वेता चिकोडी, केशर दड्डे, काजल दड्डे, तितीक्षा पाटोळे, गौरी भारती, हर्षदा पाटील यांचा समावेश होता.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

खेळाडूंना जिमखाना प्रमुख प्रा. हवलदार एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले.

२ पुण्य नगरी
▌ मंगळवार, २१ नोव्हेंबर २०२३

# 'विवेकानंद'ला मैदानी स्पर्धेत अजिंक्यपद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने जनरल चॅम्पियनशिप मिळवली. मुलींच्या संघात रिया पाटील, तन्वी जामसांडेकर, ऋतिका मगदूम, श्वेता चिकोडी, केशर दड्डे, काजल दड्डे, तितिक्षा पाटोळे व गौरी भारती, हर्षदा पाटील यांचा समावेश होता. या यशाबद्दल त्याचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखानाप्रमुख प्रा. हवालदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

21/11/23